मुं. गृ. नि. व क्षे. वि. मंडळ
आवक नं. प्रा.2905
दिनांक 15/7/15

सेवापुस्तकातील नोंदी
प्रमाणित करण्याबाबत.

**परिपत्रक :**

---

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१**
**क्र. प्राधि/संकिर्ण/२०१५/३०७६/प्र.११,१४ दि. 13 JUL 2015**

म्हाडाअंतर्गत विविध विभागातील लेखा तसेच, कार्यालयीन कामकाजाबाबत परिक्षण केले असता, बऱ्याच अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी / सेवापडताळणी अभिलेख तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत किंवा अनावधानाने प्रमाणित करावयाचे राहून गेले आहे असे निर्दशनास आले आहे. तत्कालीन अधिकाऱ्यांपैकी बहुतांशी अधिकारी सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्या स्वाक्षरी उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच सद्यस्थितीत कार्यरत असलेले अधिकारी पुर्वीच्या नोंदी प्रमाणित करण्याकरीता टाळाटाळ करत आहेत असे निर्दशनास येते. सेवापुस्तकातील नोंदी प्रमाणित केल्या नाही तर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या वेळेस लाभ अदायगी करण्याकरीता अडचणी निर्माण होतात.

उपरोक्त बाबी लक्षात घेता आदेशित करण्यांत येते की,

१) सेवापुस्तकात नोंदी घेताना सद्यस्थितीत असलेल्या कर्मचाऱ्याने स्वतःच्या स्वाक्षरीने पुर्ण दिनांकासह सविस्तर नोंदी घ्याव्यात व सदर नोंदीची पडताळणी करुन कार्यरत अधिकारी यांनी पूर्ण दिनांकासह स्वाक्षरी करावी.

२) तसेच, गतकालावधीच्या राहिलेल्या नोंदी प्रमाणित करण्याकरीता सद्यस्थितीत असलेल्या अधिकारी वर्गाने त्यांच्या आस्थापनेवरील कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकातील आदेश व नोंदीची पडताळणी करुन दिनांकासह स्वाक्षरीकरुन प्रमाणित कराव्यात.

सदर परिपत्रक विभाग प्रमुखांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्याची नोंद दप्तरी ठेवावी.

**मा.उपाध्यक्ष तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.**
**यांच्या मान्यतेने**

( दिलीप भा. हळदे )
सचिव/प्राधिकरण

प्रति,
१) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मं.
२) वित्त नियंत्रक/प्रा.
३) मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मं., कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ

२/--

कि. 1517